# महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित,
# ग्राहक तक्रार निवारण मंच
# कोल्हापूर परिमंडल, कोल्हापूर

सं. क्र. काअ/ग्रातनिमं/कोप/केस क्र. १४९/२०११-१२/ दिनांक :

| | | |
|---|---|---|
| १) | श्री. सुरेश मारुती शिंदे,<br>मु.पो. बसाप्पावाडी, ता. कवठे महांकाळ, जि. सांगली. | अर्जदार |

**विरुध्द**

| | | |
|---|---|---|
| १) | कार्यकारी अभिंयता (का.) तथा नोडल ऑफीसर,<br>म.रा.वि. वितरण कंपनी मर्यादित,<br>सं व सु मंडल कार्यालय, सांगली | |
| २) | कार्यकारी अभियंता<br>म.रा.वि.वि. कंपनी मर्यादित,<br>विभागीय कार्यालय, कवठे महांकाळ, जि. सांगली | विरुध्द पक्षकार |
| ३) | सहाय्यक अभियंता,<br>म,रा.वि.वि. कंपनी मर्यादित,<br>उप विभागीय कार्यालय, कवठे महांकाळ, जि. सांगली | |

कोरम : १) श्री. बी.जी. पवार. अध्यक्ष,
२) श्री. जी.बी. पानकर, सदस्य सचिव
३) श्री. जी.सी. लेले. सदस्य

महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग
(ग्राहक तक्रार निवारण मंच व विद्युत लोकपाल)
विनियम २००६ मधील ८.२ चे तरतुदीनुसार

## न्याय निर्णय

श्री. बी.जी.पवार, अध्यक्ष, ग्रा.त.नि.मंच, कोल्हापूर खालील प्रमाणे न्याय निर्णय देत आहेत.

श्री. सुरेश मारुती शिंदे , मु.पो. बसाप्पावाडी, ता. कवठे महांकाळ, जि.सांगली यांनी मंचाकडे अनुसूची अ मध्ये महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (ग्राहक गा-हाणे निवारण मंच व विद्युत लोकपाल) विनियम २००६ मधील कलम ६.१० नुसार वितरण कंपनी कवठे महांकाळ उप विभाग विरुध्द तक्रार दि. ८.१२.२०११ रोजी दाखल केली. त्याचा तपशील खालील प्रमाणे -

This document was created using SmartPDFCreator. To remove this message purchase the product at www.SmartPDFCreator.com

अर्जदार यांनी आपली शेत जमीन गट क्र. १५४ येथे ५ अश्वशक्ती शेतीपंपास नवीन वीज जोडणी मिळावी यासाठी वि.प.कडे दि. २२.३.२००८ रोजी अर्ज दिला, त्याची झेरॉक्स सोबत जोडली आहे. तक्रारदार यांचा रांजणी शाखा कार्यालयात दिलेला ७/१२ सापडत नसल्याने परत दि. १८.७.२०११ रोजी दिला आहे. वितरण वाहिनीचा विस्तार असलेने कृती मानके विनियमानुसार त्यांना १ महिन्यात दि. २१.४.२००८ पर्यंत चलन मिळणे आवश्यक होते. तक्रारदार यांनी अंतर्गत तक्रार निवारण कक्ष, सांगली यांचेकडे दि. १८.८.२०११ ला तक्रार दाखल केली. अंतर्गत कक्षाने दि. १५.११.२०११ रोजी कृती मानके विनियमातील तरतुदीप्रमाणे विहीत कालावधीत चलन द्यावे अन्यथा विलंबापोटी भरपाई द्यावी असे आदेश दिले. मंचाकडून अपेक्षित मदत - चलन देण्याचे वि.प.ला आदेश व्हावेत, विलंब निश्चित झाला असेल तर कृती मानके विनियमानुसार भरपाई मिळावी, विलंबाची निश्चिती झाली नसलेस कृती मानके विनियमानुसार ग्राहक भरपाईसाठी वेगळा अर्ज करणेस परवानगी मिळावी अशी विनंती केली आहे.

वितरण कंपनीने नोटीस देऊनही मुदतीत दि. २८.१२.२०११ पर्यंत आपला लेखी अहवाल दिला नाही. आपल्या दि. ६.१.२०१२ च्या लेखी अहवालात अर्जदार ग्राहकाने नवीन शेतीपंप वीज मागणी अर्ज दि. २२.३.२००८ रोजी दिला आहे, अशा आशयाची तक्रार दाखल केलेली आहे, परंतु उप विभाग कवठे महांकाळ यांनी दिलेल्या अहवालावरुन असे निदर्शनास आले आहे की, संबंधित ग्राहकाने मागणीअर्ज दाखल केलेला नाही व सदर तक्रारदाराकडे जी पोच आहे ती त्यांच्या कार्यालयाची नाही असे नमूद केले आहे.

प्रस्तुतची तक्रार दि. ११.१.२०१२ रोजी मंचासमोर सुनावणीस घेण्यात आली. तक्रारदार गैरहजर. श्री. खापरे यांनी अधिकार पत्र देण्याचे कबूल केले. वि.प.तर्फे नोडल ऑफीसर श्री. क्षीरसागर, सहाय्यक अभियंता कवठे महांकाळ उप विभाग श्री. राखे उपस्थित. त्यांनी ग्राहकाचा अर्ज उपलब्ध नाही, ग्राहकाने ७/१२ उतारा शाखा कार्यालयाकडे दिलेला नाही, ग्राहकाचा अर्ज अपूर्ण असल्याने चलन दिले नाही असे सांगितले व दि. २३.१.२०१२ पर्यंत रिपोर्ट देण्याचे कबूल केले. ग्राहक प्रतिनिधींनी ७/१२ उतारा सहाय्यक अभियंता यांचेकडे दिला असल्याचे सांगितले व सुनावणी दरम्यान मंचासमोर एक प्रत श्री. राखे यांना दिली.

खालील मुद्दा निर्णयासाठी उपस्थित होत आहे.

१) ग्राहकाने मागणी केल्याप्रमाणे त्यांना चलन देण्याचे आदेश वि.प.ला देणे योग्य होईल काय ?

उत्तर : होय

<u>कारणमिमांसा</u>

ग्राहकाने वीज मागणी अर्ज दि. २२.३.२००८ ला केल्याचे म्हटले आहे व वि.प.कडील पोचची झेरॉक्स प्रत तक्रारी सोबत जोडली आहे. वि.प.ने अशी पोच आपल्या कार्यालयाची नाही असे म्हटले आहे. तसेच तक्रारदार यांचा रांजणी शाखा कार्यालयात दिलेला ७/१२ उतारा सापडत नसल्याने परत दि. १८.७.२०११ रोजी दिला आहे. ज्याअर्थी वि.प.च्या अधिकाऱ्यांनी अर्जदाराचा ७/१२ स्वीकारला त्याअर्थी तक्रारदाराने वीज मागणी अर्ज वि.प.कडे दिला असावा असा निष्कर्ष काढता येतो. वि.प.च्या अधिका.यांनी अर्जदाराचा अर्ज अपूर्ण होता त्यामुळे चलन दिले नाही असे म्हटले आहे. विद्युत अधिनियमानुसार अपूर्ण अर्ज असला तरी तो प्रोसेस करणे आवश्यक होते.

तक्रारदाराने दि. १८.७.२०११ रोजी ७/१२ दिल्यानंतरही वि.प.ने चलन दिले नाही. तक्रारदाराने ७/१२ दिल्यापासून १ महिन्यात त्यांस चलन देणे आवश्यक होते. वितरण कंपनीचे अधिकारी कृती मानके विनियमातील तरतुदीचे पालन करण्यात अपयशी ठरले आहेत, त्यामुळे ग्राहकाची चलन देण्यास झालेल्या विलंबापोटी भरपाईची मागणी मंजूर करण्यात येत आहे. मंचासमोर सुनावणीवेळी अशा अर्जाची तपासणी किंवा झेरॉक्सची सत्यता पडताळून पाहण्यासाठी मंचातर्फे त्रयस्थ व्यक्तींची नेमणूक करण्याची विनियमात तरतूद आहे / मंचास तसा अधिकार आहे असे स्पष्ट करण्यात आले. मंचाचे सदस्य सचिव यांनी दि. २३.१.२०१२ रोजी या बाबतची चौकशी करुन माहितीची खात्री करुन घेतो असे सांगितले. त्यामुळे विलंबाचा कालावधी व त्या अनुषंगाने भरपाईची रक्कम या बाबतचा हक्क/ अधिकार ग्राहक स्वतंत्ररित्या वापरु शकतो, त्यासाठी ग्राहकाने मागितल्याप्रमाणे परवानगीची गरज नाही असे मंचाचे मत आहे. खालील प्रमाणे आदेश -

## आदेश

१) तक्रार अशंतः मंजूर करण्यात येत आहे.

२) वितरण कंपनीने कवठे महांकाळ उप विभाग, कवठे महांकाळ विभाग यांनी ग्राहकास दि. ३१.१.२०१२ पूर्वी चलन द्यावे असा आदेश मंच देत आहे, त्याची पूर्तता करुन अहवाल त्वरित मंचास द्यावा.

३) ग्राहक विलंबापोटी भरपाईबाबत स्वतंत्ररित्या अर्ज करु शकतो, असे मंच निरीक्षण नोंदवित आहे .

४) सदर आदेशाची अंमलबजावणी केल्याचे महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (ग्राहक तक्रार निवारण मंच व विद्युत लोकपाल ) विनियम २००६ ८.७ नुसार वि.प. यांनी मंचास कळवावे.

५) या निर्णयाविरुध्द तक्रारदार यांना अपील करावयाचे असलेस त्यांना आदेशाच्या तारखे-पासून ६० दिवसांचे आंत मा. विद्युत लोकपाल, केशवा. बांद्रा-कुर्ला कॉम्प्लेक्स, बांद्रा (पूर्व) मुंबई यांजकडे करता येईल.

दिनांक : ( बी. जी. पवार )
अध्यक्ष

श्री. जी. बी. पानकर, सदस्य सचिव :

श्री. जी. सी. लेले, सदस्य :

एकमताच्या / बहुमताच्या आदेशाची अंमलबजावणी करण्यात यावी.

This document was created using Smart PDF Creator
To remove this message purchase the product at www.SmartPDFCreator.com

This document was created using Smart PDF Creator
To remove this message purchase the product at www.SmartPDFCreator.com